लातूर हे हजर होते. त्यांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, सप्टेंबर २०१७ चे बील ६८५ युनीटचे रु. ७८५०/- दिले होते ते AE/U-8/LTR/No- 684 Dt.09.10.2017 नुसार विभागणी करुन दिले. त्यामध्ये ग्राहकास रु.३५०१.३९/- वजा करुन दिले आहेत व ते बरोबर आहे. तसेच मीटर तपासणी साठी मीटर टेस्टिंगबेंच उपलब्ध नसल्याने मीटर तपासता आला नाही. त्यामुळे विभागुन देण्यात आलेले बिल बरोबर असुन ते योग्य आहे

ते भरण्यास ग्राहकास आदेशीत करावे व सदरची तक्रार रद्द करावी ही विनंती. ग्राहक अर्जदार प्रतिनिधी शरद कुलकर्णी यांनी आपला युक्तीवाद मांडत असताना असे कथन केले की,महावितरण कंपनीचे एम.डी. यांनी Rolex कंपनीचे मीटर बाबत जे काही आदेश दिलेले आहेत त्यानुसार सदरचे मीटर बदलून देण्यात यावेत. त्याचबरोबर सदर ग्राहकाचे बिल दुरुस्ती कशी करावी या बाबत MERC Regulation- 2005, sec १५.४.१ चा वापर करुन ग्राहकाचे सप्टेंबर २०१७ चे बिल आदा करावे की जे नियमाप्रमाणे बरोबर आहे. असे न करता गैरअर्जदाराने वेडेवाकडे निष्कर्ष लावून रु.३५०१.३९/- इतकी रक्कम कमी केले. अंतर्गत ग्राहक गाऱ्याणे निवारण कक्ष लातूर व मंचाची दिशाभुल केली. मानसीक त्रासाचे नुकसान भरपाई द्यावी, मीटर चाचणी कोठे, कशी करावी याचे मार्गदर्शन करावे व ग्राहक अंतर्गत गाऱ्याणे कक्ष लातूर व मंचाची दिशाभुल केल्या बद्दल कार्यकारी अभियंत्यांना पत्र द्यावे अशी मागणी केली.

अंतर्गत ग्राहक निवारण मंच लातूर यांच्या दि. ०५.०१.२०१८ च्या आदेशानुसार सदर ग्राहकाचे मीटर दि.१९.०३.२०१८ रोजी टेस्ट करण्यात आले या टेस्ट नुसार या ग्राहकाचा मीटर सुस्थितीत व चांगला असुन % Error हे Permissibel Limit मध्ये असल्याचे टेस्ट रिर्पोट मध्ये नमुद केले आहे.

वर उल्लेख केल्या प्रमाणे अपिलार्थी त्याचे अ फॉर्म मधील तक्रार दाखल केलेले दस्ताऐवज म्हणजेच पत्र व सर्कूलर, स्थळ पाहणीतील वर्णन केलेल्या अहवालातील निवेदन, केलेले सरासरीचे बिला संबधीचे निवेदन व अपिलार्थी प्रतिनिधीने केलेल्या लेखी युक्तीवादावरुन खालील कारणा वरुन गुण, निष्कर्ष काढले व तसे नोंदवलेले आहेत.

गुण	**निष्कर्ष**
१) अपिलार्थी तक्रारदार ग्राहकास Rolex कंपनीचे मीटर बदलून देणे योग्य आहे काय?	होय
२) अपिलार्थी तक्रारदार ग्राहकास गैरअर्जदाराने दिलेले सरासरीचे बिल चुकीचे आहे काय?	होय
३) अंतर्गत गाऱ्हाणे निवारण कक्ष लातूर यांनी दिलेला निकाल दि.०४.०१.२०१८ चुकीचा, गैर कायदेशीर व अन्यायकारक आहे का?	नाही
४) कोणता योग्य व न्याय आदेश पारित करावा ?	शेवटी दिलेल्या आदेशा प्रमाणे